Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III | ISSUE-XII | Dec. | 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# बालकामगार व मानवाधिकार

**प्रा. एस.एस.गोईनवाड**
सहाय्यक प्राध्यापक
जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय
सिडको नांदेड. 431603

**गोषवारा :**

भारत देश हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो या युवकांच्या देशामध्ये बालक हा एक महत्वाचा घटक मानला गेला आहे. कारण की आजचा बालक हा उद्याचा युवक म्हणून ओळखला जाणार आहे. म्हणूनच आजचा बालक हा उद्याच्या देशाचा अधारस्तंभ आहे. बालकास सक्षम व सहनशील बनविणे ही समाजाची प्रत्येक घटकांची जबाबदारी आहे. पण भारतात लहान मुलांचे अनेक प्रश्न आहेत. त्यामध्ये विचार केलातर बाल मजुरी हा गंभीर विषय होत चाललेला आहे.

बालकांच्या शिक्षणात, आनंदात व खेळण्याच्या वयात त्यांना काम करावे लागत आहे. 5 ते 14 वर्ष वयोगटातील मुलांना बालकामगार म्हटले जाते 14 ते 18 वर्षा खालील मुले आज जडकामे करताना दिसून येतात. अशा या बालकामगारांना त्यांचे हक्क व अधिकार त्यांना प्राप्त करून देणेही मानवाधिकार अयोगाची महत्वपूर्ण भुमिका आहे.

**संशोधनाचे महत्व :**

बालक हा उज्वल भविष्याचा सर्वात महत्वाचा घटक आहे.कारण बालक जर निरोगी, सक्षम, शैक्षणिक व मानसिकरित्या भक्कम असणे गरजेचे आहे. अशा निरागस बालकांना आपल्या लहान वयात जर बाल मजूरी करावी लागत असेल तर बालकांना त्यांचे हक्क देऊन त्या हक्काची पायमल्ली करणे होय. त्यामुळे त्यांना त्यांच्या हक्काची जान करून देणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) बालकांच्या हक्कांचे अध्ययन करणे.
2) बालकांना समजून घेणे.
3) बालकामगारांच्या कारणांचा शोध घेणे.
4) बालकांच्या कायद्याच्या अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

संशोधकांने प्रस्तुत शोध निबंधाचे साजरीकरण करण्यासाठी प्रस्तुत विषयाशी संबंधीत अधार सामग्रीचे संकलन करण्यासाठी द्वितीय स्त्रोत्रातील सामग्री जसे ग्रंथ, मासिके, अहवाल, पुस्तके, वृत्तपत्रीय लेख इत्यादी द्वारा संदर्भिय साहित्याचा आधार घेऊन प्रस्तुत विषयावार प्रकाश टाकला आहे.

**बालकामगार म्हणजे कोण?**

अंतरराष्ट्रीय कामगार संघटना पौढत्व प्राप्त होण्यापुर्वी अल्प वेतनात दिर्घकाळ काम करावे लागल्याने त्यांचे आरोग्य ठासळते आणि त्यांच्या शारिरिक, मानसिक व सामाजिक विकासावर विपरीत परिणाम होतो. अशा सर्वांचा बालकामगार या संज्ञेत समावेश केला जातो.

**मानवाधिकार व बालमजूर :**

बाल मजुरांचा विचार केला असता असे दिसून येतेकी, बालकांना अनेक धोखादायी ठिकाणीकाम करावे लागते.व तसेच वेगवेगळ्या कारखाण्यात देखीलकाम करावे लागते.ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. बालकामगारांचे अजचे चित्र लक्षात घेऊन मानवाधिकार अयोगाने बालकामगारांच्या बाबतीत कडक पाऊले उचलण्याचीगरज आहे.

**बालमजुरीचे स्वरुप :**

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानूसार 5 ते 17 वयोगटातील 215 दशलक्ष मूले बालकामगार म्हणून कार्यरत आहेत. जगात सर्वाधिक बालकामगार भारतात असून 5 ते 14 वर्ष वयोगटातील 12% मूले बालकामगार म्हणून कार्यरत आहेत. 2001 च्या जनगणनेनुसार भारतात 5 ते 14 वर्ष वयोगटातील 12.6 दशलक्ष मूले बालकामगार आहेत.यापैकी 0.12 दशलक्ष बालकामगार धोकादायक ठिकाणीकामकरतात.6 ते 14 वर्ष वयोगटातील जी मूले शाळेच्या पटावर नोंदलीगेली आहेत. परंतु प्रत्यक्षात मात्र ती शाळा बाह्य आहेत. भारतात बालमजूरी प्रथा प्रामुख्याने ग्रामीण भागात आढळून येते.

**बालमजूरीची कारणे :**

1. शैक्षणिक कारणे :

आज भारतात शैक्षणिक स्थिती हि खुप खालावलेली दिसुन येते कारण कि पालकहे अज्ञानी असल्यामूळे आपल्या बरोबर आपल्या बालकांना देखिल कामावर घेऊन जात असे जे बालक शाळेत जावयास पाहिजेतेच बालक आपल्या पालकाबरोबर काम करताना दिसून येते.

2. आर्थीक कारणे :

आर्थीक दृष्टया विचार करता भारतात गरिबीचे प्रमाण अधिक स्वरूपाचे आहे. ज्यामूळे बालकांना जे दर्जेदार शिक्षण दिले पाहिजेते त्या बालकास मिळत नाही. गरीबीमूळे त्यांचे उत्पन्न नगन्य असल्यामूळे दोन वेळा जेवणाचे पण हालहोत असताना दिसुन येते त्यामूळे बालमजूरीस आर्थिक स्थिती खुप कारणीभूत आहे.

3. सामाजिक कारणे :

बाल मजूरीस सामाजिक स्थितीखुप कारणीभूत आहे. कारण की समाजातील मोठी कुटूंब पद्धतीही एककारण आहे. त्याच बरोबर समाजाचा दृष्टीकोण देखिल तितकाच कारणीभूत आहे .समाजात अशा बालमजूरीस विरोध करणारा वर्ग हा अल्प स्वरूपाचा आहे.

**बालकामगार कायदा (1986)**

1. या कायद्यानुसार अत्यंत धोकादायक अशा 13 व्यवसायाचा अनुसूची अ मध्ये तर 57 प्रक्रियाचा अनुसूची ब मध्ये समावेश असून यामध्ये बालकांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध आहे. 2

2. या कायदयाच्या अनुसूचि अ मध्ये नमूद केलेल्या व्यवसायात व अनुसूचि ब मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया कार्यात 14 वर्षाखालील बालकास कामावर ठेवण्यास प्रतिबंध केला आहे.
3. बालकास कामावर पाठविणा ज्यास किमान 3 महिणे व कमाल 1 वर्षा पर्यंत कारावास किंवा रूपये 10 हजार व कमाल रू.20 हजार पर्यंत दंड किंवा शिक्षा लागू आहे.

**निष्कर्ष :**

1. 5 ते 14 वर्ष वयोगटातील बालकामगारांचे प्रमाण अधिक आहे.
2. आज बालमजूरीचे प्रमाण इतर देशांच्या तुलनेत भारतात अधिक आहे.
3. बालमजूर हे धोक्याच्या ठिकाणीकामकरतांना दिसून येतात.
4. बालहक्काची पायमल्ली होताना दिसून येते.
5. बाल कायद्यांच्या अमलबजावणीचा अभाव आहे.
6. बालमजूरीची अनेक कारणे दिसून येतात.

**सारांश :**

आज बालमजूरी हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. कारण भारतात याचे अधिक प्रमाण आहे. भारतात बालमजूर प्रतिबंध कायद्या 1986 ला झाला असला तरी, आज अनेक ठिकाणी लहाण मूले काम करतांना दिसून येतात. वरिल कायद्यानुसार बालमजूरी रोखली जाऊ शकते मात्र तशी प्रत्यक्षात अमलबजावणी होताना दिसत नाही.मानवाधिकार आयोगाची भारतीय राज्यघटनेत केलेल्या तरतूदी नुसार बालकामगारावर प्रतिबंध आणला जाऊ शकतो मात्र बालकामगार विरोधात कार्यवाही झाली पाहीजे. बालकामगार यांना कामावर जावू न देणे याकरिता मानवाधिकार आयोग व पालकांनी आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. बालकांना योग्य मार्गदर्शन व शिक्षण देता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे

**संदर्भ :**

1. प्रा.पी.के.कुलकर्णी – मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड प्रकाशक पुणे.
2. श्री.नि.सबनीस - मानवी हक्क संरक्षण व अंतर राष्ट्रीय कायद्या, मुकूंद प्रकाशन
3. दत्ता सांगोलकर - मानवी हक्क
4. डॉ.के.पू.घोरनोडे – मानवाधिकार हक्क, विद्या प्रकाशन नागपूर.
5. रा.ज.लोटे - भारतातील सामाजिक समस्या, पिळांपूरे पब्लिकेशन नागपूर.